पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८
नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/९/कावि/ ५६८ /२०१०
दिनांक : २९/४/२०१०

प्रति,

मा..................................
सदस्य, विधी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

विषय : पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा दिनांक ७/५/२०१० रोजी आयोजित केलेबाबत...

महोदय / महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक ७/५/२०१० रोजी दुपारी २:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : १) सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी- ४११ ०१८

मा. विधी समिती

<u>कार्यपत्रिका क्रमांक : २१</u>

दिनांक : ७/५/२०१० वेळ : दुपारी २ :०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षिक सभा शुक्रवार, दिनांक ७/५/२०१० रोजी दुपारी २:०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

विषय क्रमांक :- १) शासन आदेशाप्रमाणे श्री.भ.द.घाडगे, वरिष्ठ लेखा अधिकारी यांची मुख्यलेखापरिक्षक पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार नेमणुक केली असून श्री.घाडगे यांना शासनाने दिनांक १० फेब्रुवारी २०११ पर्यंत तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नतीने गट अ (वरिष्ठ) पदावर पदोन्नती देवुन मुख्यलेखापरिक्षक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका या पदावर प्रतिनियुक्तीने दि.१०/२/२०११ पर्यंतच्या नियुक्तीस तसेच शासनाचे नगरविकास विभागाची मान्यता प्राप्त होईल या उमेदमान्यतेवर दि.१०/२/२०११ पर्यंत करण्यात आलेल्या नियुक्तीस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- २) श्री.सुभाष डुंबरे, अतिरिक्त आयुक्त यांना प्रतिनियुक्तीच्या अटी व शर्तीनुसार दिनांक ०२/४/२०१० पासून पुढे १ वर्ष कालावधीकरीता मुदतवाढ देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ३) श्री.शहाजी पवार, सहा.आयुक्त यांना दि.२३/३/२०१० पासून पुढे ०१ वर्ष कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ४) ड प्रभाग क्षेत्रातील उद्यानामधील किरकोळ दुरुस्तीची कामे लहान विकासाची स्थापत्य विषयक कामे करणेकामी र.रु.११,४०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ५) क प्रभाग क्षेत्रातील उद्यानामधील स्थापत्य विषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी र.रु.११,४८,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ६) ब प्रभाग क्षेत्रातील उद्यानांमधील किरकोळ दुरुस्तीची कामे व लहान स्वरुपाची स्थापत्य विषयक विकासाची कामे करणेकामी र.रु.११,८०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ७) प्राधिकरण प्रभाग क्र.४९ मध्ये टिळक रस्त्यावरील बिग इंडीया ते संत ज्ञानेश्वर चौक (भेळ चौक) पर्यंतच्या रस्त्याचे फुटपाथसाठी पेव्हर ब्लॉक बसविणेकामी र.रु.२४,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ८) दिघी मॅगझिन उंच टाकी कार्यान्वीत करणेचे दृष्टीने पाणीपुरवठा होणा-या भागात आवश्यकतेनुसार वितरण नलिका पुरविणे व टाकणेकामी र.रु.४९,८१,१२९/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ९) भोसरी विभागातील वॉर्ड क्र.१६ रामनगरी इ.भागात ठिकठिकाणी डी.आय.पाईपलाईन पुरविणे व टाकणेकामी र.रु.४९,९९,९४७/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- १०) दिघी प्रभाग क्र.१३ मध्ये पाणी पुरवठा विषयक कामे करणे (ठिकठिकाणी डी.आय.पाईप लाईन टाकणे ) कामी र.रु.४९,९५,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- ११) श्री.पुपले लिंगोजी विठ्ठलराव, इलेक्ट्रीक मोटार पंप ऑपरेटर यांनी राजीनामा मंजूर करणेबाबत केलेली विनंती, नियुक्ती आदेशातील अटी व शर्तीनुसार मनपा कोषागारात भरलेले एक महिन्याचे मुळ वेतन, सह शहर अभियंता (वि/यां) व कार्यकारी अभियंता (विद्युत) यांचेकडील अहवाल इ.बाबी विचारात घेउन श्री.पुपले लिंगोजी विठ्ठलराव यांचा गैरहजर कालावधी विनावेतनी करुन आदेशाच्या दिनांकापासून त्यांचा राजीनामा मंजुर करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- १२) १.श्री.देसले विलास नामदेव (खुला (इमाव),२.श्रीमती पाठक अनघा अविनाश (खुला),३.श्रीमती सिन्नरकर प्रेरणा प्रदिप (खुला)४. श्री.महाजन किशोर सोपान (खुला)(इमाव) ५. श्री.बोत्रे बंडु बाबुराव (खुला) या कनिष्ठ अभियंता, स्थापत्य पदावरील कर्मचा-यांना मे.आकुर्डी न्यायालय येथे दाखल असलेली याचिका क्र.३२/२००८ व मे.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल असलेली अनुक्रमे याचिका क्र.४२०६/२००८, क्र.४२०७/२००८, क्र.१५३१/२००९ आणि क्र.१२२४८/२००९ चे अंतिम निर्णयाचे अधिन राहून र.रु.१५६०० - ३९१०० ग्रेड वेतन र.रु.५४०० या वेतनश्रेणीमध्ये उपअभियंता, स्थापत्य पदावर पदोन्नतीने नेमणुक देण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- १३) निगडी पेठ से.२३ येथील जलशुध्दीकरण टप्पा - २ खाजगी ठेकेदारामार्फत चालविणेकामी र.रु.३३,६०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- १४) श्री.अशोक मुंढे यांची दिनांक २६/६/२००९ पासून दिनांक ३१/८/२००९ पर्यंतच्या कालावधीसाठी अधिसंख्य असलेले सहा.आयुक्त या अभिनामाचे तात्पुरत्या स्वरुपातील पद निर्माण करुन सदर पदावर नियुक्ती करणेस व महानगरपालिका आस्थापनेवर सहा.आयुक्त या पदावर कार्यरत असलेले अधिकारी श्री.बी.एन कांबळे हे महानगरपालिका सेवेमधून नियत वयोमानानुसार दि.३१/०८/२००९ रोजी सेवानिवृत्त झाले असल्याने सहा.आयुक्त या अभिनामाचे ०१ पद रिक्त झालेले असल्याने सदरच्या रिक्त झालेल्या पदावर श्री.अशोक मुंढे यांची दि.०१/९/०९ पासून ०१ वर्ष कालावधीसाठी नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- १५)जलशुध्दीकरण केंद्र से.नं.२३ येथील टप्पा ३ संपवेलवर वाढीव पंपहाउसचे बांधकाम करणेकामी र.रु. ६९,८२,८००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- १६) अ प्रभागातील उद्यानामधील स्थापत्यविषयक किरकोळ दुरुस्तीची कामे करणेकामी र.रु.११,७६,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्रमांक :- १७) प्रभाग क्र.११ वडमुखवाडी येथे पाणीपुरवठा विषयक कामे करणे (ठिकठिकाणी डी.आय.पाईपलाईन टाकणे) कामी र.रु.४९,९६,१६९/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत विचार करणे.

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८ नगरसचिव विभाग
क्रमांक : नस/९/कावि/ ५६८/१०
दिनांक : २९/०४/१० चे लगत

टिप :- प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेट्स) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.